ई-मेलद्वारे


महात्मा फुले कृषी विद्यापीठ

राहुरी-४१३७२२ जि. अहमदनगर (महाराष्ट्र)

संकेतस्थळ :-www.mpkv.nic.in  ई-मेल :-acaudit.mpkv@gov.in

दुरध्वनी क्र.(०२४२६)-२४३२०४  फॅक्स क्र:- (०२४२६)-२४३२३८


जा.क्र. मफुकृवि/लेखा-३/भांडार/परिपत्रक/५६२/२०१८  दि. २५/०९/२०१८

अत्यंत महत्वाचे

## परिपत्रक

**विषय :- विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध कार्यालयांमधील निरुपयोगी/विनावापर चल मालमत्तांचे (Movable Assets) हस्तांतरण, निर्लेखन व लिलाव करणेबाबतची कार्यवाही तातडीने करणेबाबत...**

१. विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील कार्यालयांकडे काही चल मालमत्ता निरुपयोगी/विनावापर स्थितीत पडून आहेत. या मालमत्तांचे विद्यापीठाच्या इतर गरजु कार्यालयांकडे सुस्थितीत हस्तांतरण झाल्यास त्या वापरात येऊ शकतील अथवा विहीत कार्यपध्दतीने निर्लेखन करुन लिलावाद्वारे विक्री केल्यास त्यांची उचित किंमत मिळू शकते. कालापव्यय झाल्यास विद्यापीठाची आर्थिक हानी संभवते.

२. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालये/ संशोधन केंद्रे/ योजना/ प्रकल्प/विभाग यांना महाराष्ट्र कृषि विद्यापीठ लेखा संहिता १९९१ मधील नियम ७.१० प्रमाणे वार्षिक भांडार पडताळणी करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने वार्षिक भांडार पडताळणी झाल्यानंतर ...

**अ)** लेखा संहिता प्रकरण २० मधील तरतुदींनुसार आयुष्यमान (Life Assumed) पूर्ण झालेल्या निरुपयोगी/कायमस्वरुपी वापरात नसलेल्या चल मालमत्तांचे (विद्युत साहित्य/बुलडोझर्स/ ट्रक्टर्स/ट्रक्स /जीप्स/ यंत्रसामुग्री/ औषधे/ रसायने इत्यादी ) निर्लेखनाबाबत महाराष्ट्र कृषि विद्यापीठ लेखा संहिता १९९१ मधील प्रकरण २० मधील नियम २०.१ व उपनियमांनुसार तातडीने कार्यवाही करावी.

**ब)** विहीत आयुष्यमान पूर्ण होण्यापूर्वीच निरुपयोगी /विनावापर पडून असलेल्या चल मालमत्तेचे निर्लेखन, लेखासंहिता प्रकरण १९ मधील तरतुदींनुसार (Write Off Losses) प्रस्तावित करण्यात यावे. सदर निरुपयोगी अथवा वापरात नसलेले वस्तू/साहित्य इतर कार्यालयास उपयोगात येत असल्यास व त्या कार्यालयाची मागणी असल्यास त्या कार्यालयास विनाविलंब हस्तांतरीत करण्यात यावे.

विद्यापीठ अधिनियम ठराव जा.क्र. एमटीजी-२(८८)/३५४/२०१५, दि. ३१ मार्च २०१५ अ.क्र. ३० (अ) अन्वये जडवस्तुंच्या लिलावास मान्यता देण्याचे अधिकार मा.कुलगुरु महोदय, मफुकृवि, राहुरी यांना देण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने प्रस्ताव सादर करुन कार्यालयातील निरुपयोगी/विनावापर चल मालमत्तांचे वापराकरिता हस्तांतरण अथवा निर्लेखन व लिलाव करणेबाबत अंमलबजावणी त्वरीत सुरु करण्यात यावी.

नियंत्रक
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी

प्रत माहितीसाठी व आवश्यक निर्देश अधिनस्त कार्यालयांना देणेस्तव सविनय सादर.

१. मा.संचालक कृषि विस्तार/ संशोधन, मफुकृवि, राहुरी.